क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१०६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ४ जून, २००३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १४ मे, २००३ (बुधवार) रोजी झालेल्या १०६ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य.

निमंत्रित :-
शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १०६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : १४ मे, २००३ (बुधवार)

वेळ : सकाळी ११.३० वाजता

सभास्थान : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
समिती कक्ष, ६ वा मजला,
वांद्रे-कुर्ला समुह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.सुशीलकुमार शिंदे<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| डॉ.सय्यद अहमद<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.सुनिल तटकरे<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.अरुण गणेश देव<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. मंगेश श्रीधर सातमकर<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.प्रद्युमन उ.महेता<br>विधानसभा सदस्य | सदस्य |

श्री.अजित निंबाळकर — सदस्य
मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन

श्री.रामानंद तिवारी — सदस्य
शासनाचे प्रधान सचिव,
नगर विकास विभाग

डॉ. टी. चंद्रशेखर
प्रकल्प संचालक/ सह महानगर आयुक्त

**बाब क्र.१ : दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१०५ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.**

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१०५ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी)**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.४ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एम.यु.आय.पी.)**

४.१ प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी प्रकल्पाची विस्तृत माहिती देताना, प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची बृहत योजना (Master Plan) तयार

करण्याकरीता मे. कन्सल्टिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (CES) या सल्लागारांची नेमणूक केली आहे. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा अंतिम बृहत योजना आराखडा तयार करण्यापूर्वी अभ्यास अवलोकन समितीची (Study Review Committee) स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये बृहन्मुंबई महानगर पालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई बंदर न्यास, मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम, वाहतूक पोलीस इत्यादी संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. सदर समितीने दिलेल्या सूचना विचारात घेऊन मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा अंतिम अहवाल तयार करण्यात आला आहे असेही प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी सांगितले.

४.२ मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामध्ये फक्त दोनच रस्ते म्हणजेच जोगश्वरी-विक्रोळी जोड रस्ता (JVLR) व सांताक्रुझ-चेंबुर जोड रस्ता (SCLR) यांचा समावेश करण्यात आला आहे. मुंबईच्या वाहतुकीच्या समस्येचा विचार करता मुंबईमध्ये नवीन रस्ते बांधणे, रस्त्यांचे रुंदीकरण करणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग, वरपूल (ROB) बांधण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ह्या प्रकल्पाच्या संपुर्ण अंमलबजावणीसाठी सुमारे रु.२,६५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामध्ये प्रकल्पासाठी करावा लागणारा आकस्मिक खर्च, किंमतीत होणारी वाढ, भूसंपादन व पुनर्वसन इत्यादींचा समावेश नाही असेही प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले.

४.३ मे. कन्सल्टिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (CES) यांनी मुंबई बेट शहरासाठी तयार केलेला बृहत योजनेचा (Master Plan) अहवाल बैठकीच्या वेळी सदस्यांना (पुरक टिप्पणी म्हणून) सादर करण्यात आला आहे असे प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी नमुद केले. त्यानंतर मे. कन्सल्टिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (CES) यांनी मुंबई नागरी पायाभूत प्रकल्पाचे सादरीकरण प्राधिकरणाच्या सदस्यांना केले. मे. कन्सल्टिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (CES) यांनी

सादरीकरण करतेवेळी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प तयार करण्यामागील उद्देश उदा. मुंबईतील वाहतुकीची समस्या, रस्त्यांच्या जाळयांच्या व्यवस्थेचे विश्लेषण करणे व वाहतूकीच्या समस्या कमी करणे, उपनगरामधील पूर्व व पश्चिम जोडरस्त्यांची सुधारणा व कार्यक्षमता वाढविणे, उपनगरातील प्रमुख उत्तर व दक्षिण रस्त्यांचा विकास करणे, सार्वजनिक परिवहन सेवेसाठी कार्यक्षम परिवहन स्त्रोत निर्माण करणे, पादचा-यांकरीता सुरक्षित व सोयींचे पादचारी पूल, पदपथ व रेल्वे स्थानक परिसर वाहतूक सुधारणा राबविणे इत्यादि बाबींची संक्षिप्त माहिती सल्लागाराने दिली. वरील उद्दिष्ट साधण्यासाठी बृहत योजनेचा आराखडा (Master Plan for Road Network improvements & Traffic dispersal System) वाहतुकीची सन २०२१ पर्यंतची मागणी विचारात घेऊन करण्यात आला आहे असेही सल्लागाराने सांगितले.

४.४ त्यानंतर प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प बृहत योजनेमध्ये सुमारे ४८२.५८ कि.मी.च्या १३२ रस्त्यांचे बांधकाम (D.P. Road), १० उन्नत रस्ते/ लांब पल्ल्याचे उड्डाणपूल (Elevated Road), ४१ उड्डाण पूल, १६ वरपूल (ROB), १० वाहतूक भूयारी मार्ग (Vehicular Subways), ४३ पादचारी भूयारी मार्ग (Pedestrain Subways) यांचा समावेश आहे आणि या योजनेच्या अंमलबजावणीकरीता एकूण अंदाजित खर्च रु.२,६४७.५८ कोटी इतका अपेक्षित आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी सदरहू प्रकल्पास लागणारा निधी प्राधिकरणाकडून शासनाच्या अर्थसंकल्पाच्या तरतूदीमधून, केंद्र शासनाच्या योजनेमधून, पथकरांतून, उड्डाणपूलाखालील जागेचा वाणिज्यिक उपयोग करुन, तसेच इमारतींवर काही प्रमाणात कर आकारुन इत्यादी मार्गाने निधी उभा करणे शक्य होईल असेही सांगितले.

४.५ प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या बृहत योजनेसाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. कार्यकारी समितीने प्रकल्पासाठी लागणा-या निधीच्या स्त्रोताचा आढावा घेतेवेळी प्राधिकरणाकडे

असलेला निधी शासनाकडे व सार्वजनिक उपक्रमांकडे अडकला असल्यामुळे व शासनाची आर्थिक स्थिती पाहता मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करावी व जी कामे अहवालामध्ये प्राथम्यांने वर्ग -१ मध्ये करावी असे सुचित केले आहे. त्याच कामांचे सविस्तर आराखडे व अंदाजित खर्चाचा तपशील, निधीच्या उपलब्धतेनुसार तयार करण्यात यावा अशी शिफारस दि.२४.४.२००३ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २०१ व्या बैठकीत करण्यात आलेली आहे. उर्वरीत कामांचे आराखडे/ अंदाजित खर्चाच्या किंमतीचा तपशील, निधी उपलब्ध झाल्यानंतर तयार करण्यात यावा असे कार्यकारी समितीने सुचविले आहे. त्यामुळे प्राधान्य क्र.१ मधील योजनेसाठी पूर्व उपनगरासाठी रु.१०४९ कोटी, पश्चिम उपनगरासाठी रु.५०१ कोटी व मुंबई बेट शहरासाठी रु.४३० कोटी असा एकूण रु.१९८० कोटी खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सन २००३ ते २००६ पर्यंत करण्यात येईल असे प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी सांगितले.

४.६ मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सुचित केले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रस्ताव पादचारी पूल (Foot Over Bridge) भूयारी मार्गाचे नियोजन करताना मुंबईतील फेरीवाल्यांचा तेथे समावेश करण्याचा विचार करण्यात यावा तसेच मुंयई बेट शहरातील काही भागात विशेषतः परेल, दादर इत्यादी भागात उदा.जी.डी. आंबेकर मार्ग, एन.एम. जोशी मार्ग इत्यादी रस्त्यांच्या दोन्ही बाजूस चाळी आहेत. या चाळींचा पुनर्विकास गलिच्छ सुधार योजनेअंतर्गत करणे शक्य आहे का याचाही विचार करण्यात यावा. त्यामुळे मुंबईतील रस्ते रुंदीचा धोरणात्मक कार्यक्रम राबविताना संबंधित परिसरातील रहिवाशांनाही त्याचा लाभ घेता येईल. मा. मुख्यमंत्री यांनी पुढे निदेश दिले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प यांचे सविस्तर संकल्प-चित्र व आदिरुप प्रतिकृती (Prototype Model) तयार करण्यात यावे व या योजनेची प्रसिध्दी विविध माध्यमांद्वारे करण्यात यावी. आदिरुप प्रतिकृती (Prototype Model) बृहन्मुंबई महानगर पालिका, मंत्रालय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, या कार्यालयांच्या माहिती केंद्रात ठेवण्यात यावी.

४.७ सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर, प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प प्राधान्य क्र.१ योजनेमधील सुमारे ३४३.७८ कि.मी.च्या ८३ रस्त्यांचे बांधकाम (D.P. Road), ७ उन्नत रस्ते/ लांब पल्ल्याचे उड्डाणपूल (Elevated Road), ३६ उड्डाणपूल, ४ वरपूल (ROB), १० वाहतूक भूयारी मार्ग (Vehicular Subways) व २५ पादचारी भूयारी मार्ग (Pedestrain Subways) अशा एकुण रु.१९८० कोटीच्या प्रकल्प खर्चास प्राधिकरणाने प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता दिली व पुढील प्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ९६९</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ (डी) आणि (आय) ला अनुसरुन प्राधिकरण, मेसर्स कन्सल्टिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांनी बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत, पूर्व व पश्चिम उपनगरांकरीता आणि मुंबई बेट शहरासाठी बृहत योजना (Master Plan) आराखडा तयार केला आहे त्याची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यास प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** पूर्व व पश्चिम उपनगराकरीता तसेच मुंबई बेट शहरासाठी बृहत योजना (Master Plan) आराखडयातील जी कामे प्राथम्याने प्रवर्ग -१ मध्ये नमुद केली आहेत उदा. सुमारे ३४३.७८ कि.मी.च्या ८३ रस्त्यांचे बांधकाम (D.P. Road), ७ उन्नत रस्ते/ लांब पल्ल्याचे उड्डाणपूल (Elevated Road), ३६ उड्डाण पूल, ४ वरपूल (ROB), १० वाहतूक भूयारी मार्ग (Vehicular Subways) व २५ पादचारी भूयारी मार्ग (Pedestrain Subways) इत्यादिंसाठी येणा-या एकुण रु.१९८० कोटीच्या प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४अ (२)(अ) नुसार मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक असणारे पुढील अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत :-

१) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे धोरण निश्चित करणे.

२) प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेता निविदांची संख्या ठरविणे.

३) कामाच्या व्याप्तीमध्ये जरुरीचे किरकोळ बदल करणे.

४) सवर्कष अभियांत्रिकी / संकल्पचित्रांप्रमाणे खर्चामधील बदल (२०% पर्यंत जास्त किंवा कमी) करणे, तथापि सदरहू खर्च हा प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण खर्चाच्या मर्यादेत राहील.

५) सर्व तांत्रिक तरतूदी ठरविणे.

६) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाकरीता आवश्यक कर्मचारी वर्गाची नेमणूक कंत्राटी तत्वावर करणे.

७) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता क्षेत्रकार्यालये, मोबाईल्स, वाहने, फर्निचर इत्यादिकरीता आणि लिपिकवर्गीय/सहाय्यकारी कर्मचा-यांचा आणि तांत्रिक पदांसाठी प्रशासकीय खर्च करणे (प्रकल्प खर्चाच्या २% पेक्षा जास्त नाही).

८) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करणे आणि प्रचलित पध्दत अनुसरुन इतर सल्लागारांची कामासाठी नेमणूक करणे तसेच अर्थसंकल्पीय तरतूदीच्या आधिन राहून रु.५ कोटीपर्यंत खर्चाची निविदा स्विकारणे.

९) प्रकल्पबाधित लोकांचे पुनर्वसन SRA योजनेअंतर्गत करणे व त्यासाठी लागणा-या जमिनीचे संपादन करुन पुनर्वसन योजना मंजूर करणे.

१०) महानगर आयुक्तांना मुख्य मुंबई नागरी पायाभूत प्रकल्प व त्या संबंधीतील इतर सर्व अनुषंगीक कार्ये राबविण्याकरीता प्राधिकृत करणे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या रस्ते प्रकल्पाच्या धर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण इत्यादी संस्थांना मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी सोपविण्याकरीता महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे आणि प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाकरीता जी पध्दत अवलंबविण्यात येते त्याच पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

"त्यापुढे असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणीची ऑक्टोबर २००६ पर्यंत पूर्ण करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.५</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी कर्मचारी वर्गाची नेमणूक करणे, नवीन वाहने भाडयाने घेणे / खरेदी करणे तसेच दुरध्वनी व मोबाईल्स खरेदी करणेबाबत.</u>

५.१ प्रकल्प संचालक व सह महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीची संक्षिप्त माहिती दिली. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी लागणा-या कर्मचारी वर्गाची नेमणूक करणे, नविन वाहने भाडयाने घेणे किंवा खरेदी करणे तसेच दूरध्वनी व मोबाईल्स् फोन खरेदी करण्याकरीता शासनाने मान्यता दिली आहे असे सांगितले.

५.२ सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १७० :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यासाठी बाब टिप्पणीच्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या ३८ अधिकारी/कर्मचा-यांच्या पदांवर शासनाच्या वित्त विभागाकडे निर्माण करण्यात आलेल्या अतिरिक्त कर्मचारी सेलमधून तात्पुरत्या स्वरुपाची नेमणूक करण्यास मान्यता देत आहे. सदर सेलकडे जे अधिकारी/कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत ते फक्त प्रतिनियुक्तीवर किंवा करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात घेण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत शासनाने मंजूर केलेल्या पदांवर सर्व प्रकारच्या नियुक्त्या (कंत्राट पध्दतीने किंवा प्रतिनियुक्तीने) करण्याचे अधिकार आणि सेवाविषयक अटी व शर्ती मंजूर करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** महानगर आयुक्त यांना मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांसाठी मंजूर पदांच्या पदनामात आवश्यकतेनुसार बदल, गरजेप्रमाणे पदांच्या वेतनश्रेणीत एक स्तर कमी किंवा जास्त करणे, योग्य ती वेतनश्रेणी/एकत्रित पगार देणे इत्यादीसाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार नवीन वाहने, दूरध्वनी व मोबाईल्स खरेदी करण्यास प्राधिकरण महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

******************